**रयत शिक्षण संस्थेचे,**

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त)

## विद्यार्थिनी वसतिगृह वार्षिक अहवाल २०२०-२१

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोरोना महामारीचा प्रादुर्भाव असल्याने विद्यार्थिनी वसतिगृह डिसेंबर २०२० मध्ये सुरु करण्यात आले.तर शासनाकडून प्राप्त सूचनानुसार माहे मार्च २०२१ मध्ये वसतिगृह पुन्हा बंद ठेवण्यात आले.या कालावधीदरम्यान विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये खालील उपक्रम आयोजित करण्यात आले.

- सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये कमवा व शिका योजनेच्या १७ व इतर ९८ अशा ११५ विद्यार्थींनीनी प्रवेश घेतलेला होता.
- वसतिगृहातील कमवा व शिका योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थिनींना मोफत गणवेश वाटप करण्यात आले.
- १९ फेब्रुवारी २०२१ रोजी विद्यार्थिनी वसतिगृहातील विद्यार्थिनींनी सामजिक अंतराचे पालन करून छ.शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण केली.
- २३ फेब्रुवारी २०२१ रोजी संत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त वसतिगृहातील स्वच्छता कर्मचारी यांना शुभेच्छा संदेश पत्र, पुष्पगुच्छ व पेढे देवून सर्व विद्यार्थिनीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.
- दिनांक १२ मार्च २०२१ रोजी विद्यार्थिनी वसतिगृह समिती, अँटी रॅगींग समिती व महिला विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यामाने विद्यार्थिनींसाठी ‘स्वसंरक्षण कार्यशाळेचे’ आयोजन करण्यात आले.या प्रसंगी साधन व्यक्ती म्हणून गीता कणसे व मयुरी जाधव यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षण करण्यासाठी प्रशिक्षण दिले.
- दिनांक ०८ मार्च २०२१ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ. रोशनआरा शेख यांनी विद्यार्थीनींना ‘महिला सबलीकरण’ या विषयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख व उपप्राचार्य डॉ.अनिलकुमार वावरे यांनी भूषविले.
- महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२१/ प्र.क्र.३०/विशी.५ दि.०३.०६.२०२१ यांचेकडील प्राप्त सूचनांनुसार दिनांक ०६ जून हा दिवस ‘शिवस्वराज्य दिन’ म्हणून साजरा करणेबाबत कळविण्यात आलेले होते. या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून व सामाजिक अंतराचे पालन करून दिनांक ०६ जून २०२१ रोजी महाविद्यालयात इतिहास विभाग,सांस्कृतिक विभाग व विद्यार्थिनी वसतिगृह समिती यांचे संयुक्त विद्यमाने ‘शिवस्वराज्य दिनाचे’आयोजन करण्यात आले.या प्रसंगी महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ.विठ्ठल शिवणकर यांनी विद्यार्थिनी वसतिगृह येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण केली.